महाराष्ट्र शासन
निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क,कागल जि.कोल्हापूर यांचे कार्यालय
धुण्याच्या चावीजवळ,जुनी दारू भटटी,रंकाळा टॉवर
कोल्हापूर ४१६०१२
ईमेल- ipstateexcisekagal@gmail.com

क्रमांक डिईटी 112026/946/दु.निरी.कागल क्र.3 कोल्हापूर

दिनांक.19/06/2026

Cri.M.A. 37/2026
Exh. 16/D

प्रति,

मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो,
कागल न्यायालय, ता.कागल
जि.कोल्हापूर.

(मा.सरकारी अभियोक्ता सो, न्यायालय,कागल यांचे मार्फत सविनय सादर)

सादरकर्ता :- दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क,कागल क्रमांक 3 (तपास अधिकारी)

विषय :- सीआर नं.8/2026 ,दिनांक 18/01/2026 या गुन्हयात जप्त केलेल्या मोबाईल संच परत देण्याबाबत व गुन्ह्यातील हिरण्या पॅकेजिंग कंपनी सिलबंद असलेबाबत म्हणणे.

संदर्भ :- किरकोळ फौजदारी अर्ज नं. 37/2026 मधील जप्त मुद्देमालाबाबत म्हणणे सादर करणेबाबत.

म.आ.क्र२०७४/ इ.आ.क्र
दाखल तारीख २०/ ६ /२०२६
सहाय्यक अधिक्षक
दि न्या व फौ कनिष्ठ स्तर, कागल

महोदय,

Order
Seen and Filed

J.M.F.C.
22.06.2026

उपरोक्त विषयास व संदर्भास अनुसरून सविनय म्हणणे सादर करण्यात येते की, दिनांक 18/01/2026 रोजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर छापा टाकण्यात आला.

छाप्यादरम्यान टाटा मोटर्स कंपनीचा मॉडेल 1512/LPT ट्रक क्रमांक MH-40-CM-2635 यामधून गोवा राज्यात निर्मित व महाराष्ट्र राज्यात विक्रीसाठी असलेले बनावट "रॉकेट देशीदारू संत्रा" हे मद्य वाहतूक करताना आढळून आले. सदर कारवाईमध्ये अंदाजे रुपये 61,15,700/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून ते मद्य विक्री करण्याच्या उद्देशाने त्याची वाहतूक करीत असल्याचे निष्पन्न झाले. सदर गुन्हयाच्या तपासामध्ये मे. हिरण्या पॅकेजिंग प्रा.लि.कंपनी गडहिंग्लज येथिल कागदी पुठ्ठ्याचे बॉक्स तयार करण्याचे आरएस-4 प्रिंटिंग मशीन, तसेच देशीदारू "टँगो पंच" या ब्रँडच्या खाकी रंगाच्या कागदी पुठ्ठ्याचे बॉक्सचे 2000 बंडल, कोकण प्रीमियम या ब्रँडचे 10000 बंडल, जॉन डिस्टिलरी या ब्रँडचे 10000 बंडल, तसेच देशीदारू टँगो पंच या ब्रँडचे 45000 बंडल व देशीदारू "रॉकेट संत्रा" या ब्रँडचा खाकी रंगाचा कागदी पुठ्ठ्याचा 1 बंडल, तसेच मोबाईल संच असा एकूण रु. 24,95,010/- किमतीचा मुद्देमाल मिळून आला आहे.

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.06.22 17:38:02 +0530

**अ) सदर गुन्हयातील मोबाईल संच बाँन्डवर परत मिळणेबाबत अर्जदारांनी किरकोळ फौजदारी अर्ज नं.37/2026 नुसार अर्ज नामंजूर करणेबाबत कारणे खालील प्रमाणे आहेत.**

1. **या गुन्हयातील जप्त असलेला सॅमसंग कंपनीचा मोबाईल हँडसेट, मॉडेल A-55, IMEI क्र. 352053261743879 हा सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये हा मोबाईल अत्यंत महत्त्वाचा व मुख्य (Physical Evidence) वस्तु स्वरुपात पुरावा आहे. तपासादरम्यान असे निष्पन्न झाले आहे की, या मोबाईल संचाचा वापर करून गुन्ह्यातील फरार आरोपी नामे संजय दत्ताराम साळगावकर याच्याशी संभाषण झाल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले असून, त्यासंबंधीचे सीडीआर प्राप्त झाला असून कॉल रेकॉर्ड व इतर डिजिटल पुरावे या मोबाईलद्वारे प्राप्त झाले आहेत.**

**त्यामुळे सदर मोबाईल संचचा वापर या गुन्हायातील फरार आरोपीचा शोध लागल्यानंतर त्यांची समोरासमोर चौकशी करणेकामी होणार आहे. तसेच गुन्ह्यातील आरोपींच्या परस्पर**

Scanned with OKEN Scanner

**संबंधांची व सहभागाची साखळी सिद्ध करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा पुरावा आहे. त्यामुळे न्यायहित व तपासाच्या दृष्टीने सदर मोबाईल संच न्यायालयीन आदेश होईपर्यंत जप्त स्थितीत ठेवणे अत्यावश्यक आहे.**

2. सॅमसंग कंपनीचा मोबाईल हॅडसेट, मोडेल A-55 ,IMEI NO.352053261743879 हा मोबाईल संच या कार्यालयाकडे सुरक्षित आहे. तसेच मोबाईल संच या कार्यालयाकडे सबळ पुरावा म्हणून जप्त असणे आवश्यक असून तो कार्यालयाच्या मुद्देमाल कक्षात सुरक्षीत ठेवण्यात आला आहे.
3. तसेच आरोपी हे बॉक्स छपाईचा व्यवसायात कायम आहेत. सदर मोबाईल मध्ये इतर आरोपींचे मोबाईल नंबर असण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोबाईल संच परत दिल्यास अशा प्रकारच्या गुन्हयात वापर करण्याची शक्यता आहे .
4. **या गुन्हयातील सॅमसंग कंपनीचा मोबाईल हॅडसेट, मोडेल A-55 ,IMEI NO.352053261743879 हा मोबाईल संच या गुन्हयातील सबळ पुरावा म्हणून महाराष्ट्र मद्यनिषेध कायदा 1949 चे कलम 132 (अ) प्रमाणे सदर मोबाईल हा मा.दंडाधिकारीसो यांचेकडे पाठवणे अद्याप बाकी आहे. त्यामुळे या कार्यालयाकडे सदर मोबाईल हा पुरावा म्हणून कब्जेत असणे आवश्यक वाटते.**

**ब) सदर गुन्हयातील जागा/मशनरी बॉन्डवर परत मिळणेबाबत अर्जदारांनी किरकोळ फौजदारी अर्ज नं.37/2026 नुसार अर्ज नामंजूर करणेबाबत कारणे खालील प्रमाणे आहेत.**

1) सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान गुन्हास्थळ ही गुन्हयाची जागा असून घर क्र. १२५७/१२५८/२, टिळक पेठ, बँक ऑफ बडोदा जवळ, मे. हिरण्या पॅकेजिंग प्रा. लि., गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर येथील कंपनी/कारखान्याचा अपराधाशी संबंधीत संशयीत मुद्देमाल **कागदी पुठ्ठ्याचे बॉक्स तयार करण्याचे आरएस-4 प्रिंटिंग मशीन,** तसेच देशीदारू **"टँगो पंच"** या ब्रँडच्या खाकी रंगाच्या कागदी पुठ्ठ्याचे बॉक्सचे **2000 बंडल, कोकण प्रीमियम** या ब्रँडचे 10000 **बंडल, जॉन डिस्टिलरी** या ब्रँडचे *10000* **बंडल,** तसेच **देशीदारू टँगो पंच** या ब्रँडचे **45000 बंडल** व **देशीदारू "रॉकेट संत्रा"** या ब्रँडचा खाकी रंगाचा कागदी पुठ्ठ्याचा **1 बंडल,** तसेच मोबाईल संच या गुन्हयाच्या तपासाकामी जप्त करून सदर ठिकाणची जागा ,वस्तु व मशनरी हे सर्व गुन्हयाअंतर्गत गुन्हास्थळावरून पंचांसमक्ष पंचनामा करून दिनांक २२/०१/२०२६ रोजी सदर कंपनी/कारखाना सीलबंद करण्यात आलेला आहे.

2) **भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १०६ अन्वये, सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेल्या बॉक्सच्या छपाई व निर्मितीसाठी वापरण्यात आलेली यंत्रसामग्री (मशिनरी) गुन्ह्याशी प्रत्यक्षपणे संबंधित असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. तसेच गुन्ह्यातील बॉक्स तयार करण्यासाठी वापरण्यात आलेली यंत्रसामग्री या घटनास्थळी रितसर पंचनामा अतर्गत सिलबंद करण्यात आलेली आहे.**

**सदर यंत्रसामग्री आकारमानाने मोठी, जड व स्थिर स्वरूपाची असल्यामुळे ती न्यायालयासमोर प्रत्यक्ष सादर करणे अथवा न्यायालयाच्या ताब्यात सोईस्करपणे आणणे शक्य नाही. त्यामुळे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ कलम 106 मधील लागू तरतुदींनुसार या गुन्हयाची संपरिक्षा पुर्ण होईपर्यत सदर यंत्रसामग्री सीलबंद स्थितीमध्ये ठेवणे आवश्यक आहे.**

3) या गुन्हयाच्या जॉन डिस्टिलरी या ब्रँडचे 10000 बंडलची अधिकृत छपाईबाबत कोणताही पुरावा अथवा कागदपत्रे सादर केली नाहीत.

4) **या गुन्हयातील मुद्देमाल सदर हिरण्या पॅकेजिंग प्रा. लि., गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर या कंपनीमध्येच सिलबंद केलेला असून कंपनीचे सिल उघडल्यास गुन्ह्याशी संबंधित महत्त्वाच्या पुराव्यांमध्ये फेरफार होण्याची किंवा ते नष्ट होण्याची शक्यता आहे .**

Scanned with OKEN Scanner

5) या गुन्हयातील जप्त असलेला सॅमसंग कंपनीचा मोबाईल हॅडसेट, मोडेल A-55 ,IMEI NO.352053261743879 हा मोबाईल संच व तात्पुरत्या स्वरूपात कुलूपबंद केलेली मे. हिरण्या पॅकेजिंग प्रा.लि.कंपनी गडहिंग्लज येथिल मशनरी या गुन्हयातील सबळ पुरावा म्हणून महाराष्ट्र मद्यनिषेध कायदा 1949 चे कलम 132 (अ) प्रमाणे या कार्यालयाकडे पुरावा म्हणून कब्जेत आवश्यक आहे.

6) या गुन्हयातील सिलबंद केलेली जागा, कागदी पुठ्ठ्याचे बॉक्स तयार करण्याचे प्रिंटिंग मशीन, देशीदारू "टँगो पंच" कागदी पुठ्ठ्याचे बॉक्सचे 2000 बंडल, कोकण प्रीमियम या ब्रँडचे 10000 बंडल, जॉन डिस्टिलरी या ब्रँडचे 10000 बंडल, देशीदारू टँगो पंच या ब्रँडचे 45000 बंडल व देशीदारू "रॉकेट संत्रा" या ब्रँडचा खाकी रंगाचा कागदी पुठ्ठ्याचा 1 बंडल इत्यादी सर्व मुद्देमाल जागे अभावी व वाहतूक करणे शक्य नसल्यामुळे कंपनीच्या जागेत सिलबंद करण्यात आले आहे. सदर कंपनीची जागा तपासाच्या दृष्टीने सदर कंपनी या गुन्हयाची संपरिक्षा संपेपर्यत सिलबंद ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कंपनीचे सिल सध्या उघडण्यास परवानगी दिल्यास मुद्देमाल व या गुन्हयातील संशय असलेल्या वस्तू हया हिरण्या पॅकेजिंग प्रा. लि., गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर या गोडावून मध्ये असलेमुळे संपरिक्षेच्यावेळी पुरावे सादर करणे आवश्यक आहे. म्हणून सदर कंपनीचे सिल उघडण्यास परवानगी देण्यात येवू नये,अशी मा. न्यायालयास नम्र विनंती आहे.

आपल्या माहितीस्तव व पुढील योग्यत्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

पाहून दाखल व सविनय सादर

(एस.एस.आंबेरकर)
निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
कागल. जि.कोल्हापूर

आपला विश्वासू,

(ए.आर.नायकुडे)
तपास अधिकारी तथा,
दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क,
कागल क्रमांक 3 जि.कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner